# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

क्रमांक-तक्रार-१३५/२०२५ दिनांक :- ०१ एप्रिल, २०२६

१. श्री. बापुजी आनंदराव इटनकर,
मु. पो. हळदा, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर. -- तक्रारदार

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय हळदा, ता.ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर --जन माहिती अधिकारी

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती ब्रम्हपुरी, ता.ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर -- प्रथम अपिलीय अधिकारी

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार आयोगास दिनांक २६.०३.२०२५ रोजी (प्राप्त दि. ०१.०४.२०२५) थेट तक्रार अर्ज सादर केला आहे. या तक्रार अर्जा मध्ये तक्रारदार यांनी " माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९ (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथस्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यक्ती व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(६) अन्वये पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करुन, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९(३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णया विरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), यामध्ये सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२.१२.२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये — The nature of the power under Section १८ is supervisory in character whereas the procedure under Section १९ is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the stature, namely, by following the procedure under Section १९. This Court is, therefore, of the opinion that Section ७ read with Section १९ provides a complete statutory mechanism to a person who is

aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९(१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता आयोगास असे निदर्शनास आले आहे की, तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ६(१) अंतर्गत दिनांक १८.१२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती ब्रम्हपूरी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर केले. त्यानंतर तक्रारदार यांनी "३० दिवसाचे आत माहिती मिळणे अपेक्षीत असतांना कोणतीच माहिती मिळाली नाही" असे कारण नमुद करुन कलम १९ (१) अन्वये दिनांक २३.०१.२०२५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती ब्रम्हपूरी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६.०३.२०२५ रोजी सुनावणी घेवून " अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार, २००५ अंतर्गत दिनांक १८.१२.२०२५ रोजी जोडपत्र-अ अन्वये मागणी केलेली माहिती श्री. एम. बी. कुरसुगे, मानिव जन माहिती अधिकारी तथा वि. अ.(पंचा.) यांनी माहितीचा अधिकार- २००५ चे कायदयातील नियमानुसार सदर आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासून ७ दिवसाचे आत अपिलार्थी यांना विनामुल्य देण्यात यावी", असे नमूद करुन आदेश पारीत केले. तद्नंतर तक्रारदार यांनी "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन आयोगाकडे कलम १८ (१) अन्वये थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, त्यांनी कलम १९ (३) नुसार आयोगाकडे व्दितीय अपिल केलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी कलम १९ (३) अंतर्गत उपलब्ध असलेल्या संपूर्ण वैधानिक कार्यप्रणालीचा अवलंब न करता कलम १८ चा वापर केला आहे.

तक्रारदार यांची कलम १९(३) अंतर्गत कार्यप्रणालीचा अवलंब न करता अशा पध्दतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसंगत ठरते.

तथापि, तक्रारकर्ता यांच्या दिनांक २६.०३.२०२५ रोजी (प्राप्त दि. ०१.०४.२०२५) थेट तक्रार अर्जान्वये आयोगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हळदा, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र.१३५/२०२५/तक्रार शाखा/२०८४, दिनांक ०६.०५.२०२५ अन्वये तक्रारदार यांच्या दिनांक १८.१२.२०२४ रोजीच्या माहिती अर्ज व दिनांक २३.०१.२०२५ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती ब्रम्हपुरी यांनी दिनांक ३०.०५.२०२५ च्या पत्रान्वये (प्राप्त दिनांक ०३.०६.२०२५) आयोगास अहवाल सादर करुन त्यामध्ये " तक्रारदार, श्री. बापुजी आनंदराव इटनकर यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये जोडपत्र-ब मधील अपील अर्ज दिनांक २३.०१.२०२५ ला या कार्यालयास प्राप्त झाला. सदर जोडपत्र-ब चे अनुषंगाने दिनांक ०६.०३.२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सदर सुनावणी दरम्यान श्री. एम. बी. कुरसुंगे, मानिव जन माहिती अधिकारी तथा वि. अ.(पंचा.) यांनी माहितीचा अधिकार, २००५ चे कायदयातील नियमांनुसार सदर आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासून ७ दिवसाचे आंत अपिलार्थी यांना विनामुल्य देण्यात यावी, असे आदेश पारीत करण्यात आले. सदर आदेशाचे अनुषंगाने श्री. एम. बी. कुरसुंगे, मानिव जन माहिती अधिकारी तथ वि. अ. (पंचा.) पंचायत समिती, ब्रम्हपुरी यांनी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन चौकशी अहवाल कार्यालयीन पत्र क्र. १०७/२०२५, दि. ०१.०४.२०२५ अन्वये मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर चौकशी अहवाल श्री. एम. बी. कुरसुंगे, मानिव जन माहिती अधिकारी तथ वि. अ. (पंचा.) पंचायत समिती, ब्रम्हपुरी यांनी कार्यालयीन पत्र क्रमांक प्रसंब्र./पंचा./टे-२२/मा.अ./९६/२०२५, दि. २८.०३.२०२५ अन्वये अपिलार्थी यांना सदर माहिती पुरविण्यात आलेली आहे. " असे नमुद केले.

सबब, मानिव जन माहिती अधिकारी तथा वि. अ. (पंचा.) पंचायत समिती, ब्रम्हपुरी, श्री. एम. बी. कुरसुंगे यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार दिनांक २८.०३.२०२५ च्या पत्रान्वये तक्रारकर्त्यास माहिती पुरविली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हिल अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर दिलेले आदेशानुसार तसेच मानिव जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती अर्जानुसार दिनांक २८.०३.२०२५ रोजी माहिती पुरविली असल्याने तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: ०१.०४.२०२६

जा.क्र. २९४९ दि. 7 APR 2026

E:\SD \तक्रारशाखा\थेट तक्रार आदेश -इटनकर